समरी क्रि.के.नं.        /२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल**

**यांचे कोर्टात ....**

Exh. 4/C

**तानाजी निवृत्ती लोंढे** ........ फिर्यादी

ORDER-----------

विरूद्ध

**प्रमोद धोंडीराम वाडकर** ......... आरोपी

## व्हेरिफिकेशन

मी यातील फिर्यादी श्री. तानाजी निवृत्ती लोंढे, व.व.३६, धंदा : बांधकाम व्यावसायिक, रा. अर्जुनी, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

१) मी बांधकाम व्यावसायीक आहे. यातील आरोपी हे सिव्हील इंजिनिअर असून त्यांचे चौगुले अड्डा, नानीबाई चिखली, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे आर.सी.सी. घराचे बांधकाम करावयाचे होते. मी बांधकाम व्यावसायिक असलेचे आरोपी यांना माहिती असलेमुळे आरोपी यांनी माझेकडून बांधकाम करून घेणेचे ठरविले. त्यानुसार आरोपी व माझेमध्ये सदर बांधकामाबाबत सविस्तर चर्चा झाली. त्यानुसार मी आरोपी यांनी सांगितलेप्रमाणे आर.सी.सी बांधकाम पूर्ण करून दिलेले आहे. सदर आर.सी.सी. बांधकामाचे मजुरीची रक्कम रू. १०,२८,०००/– (रू. दहा लाख अठ्ठावीस हजार फक्त) इतकी रक्कम झालेली होती. आरोपी यांनी मला अंतिमतः दि. २१/०६/२०२३ इ. रोजी रक्कम रू. १,००,०००/– अदा केलेली आहे. त्यानुसार वेळोवेळी आरोपी यांनी मला एकूण रक्कम रू. ८,८३,०००/– (रू. आठ लाख त्र्याऐंशी हजार) इतकी रक्कम अदा केलेली आहे. सदरची रक्कम देतेवेळी व तदनंतर आरोपी यांनी उर्वरित रक्कम आर्थिक

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

अडचणीमुळे लवकरच अदा करणेबाबत ग्वाही दिली होती. तथापि, उर्वरित रक्कम रू. १,४५,०००/— (रू. एक लाख पंचेचाळीस हजार) ही अद्याप ही आरोपी यांचेकडून मला देय आहे.

२) आरोपी यांनी माझी देय असणारी कायदेशीर रक्कम रू. १,४५,०००/— (एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) ही मी आरोपी यांचेकडे वेळोवेळी मागणी करूनही सदरची रक्कम देणेस आरोपी यांनी टाळाटाळ केलेली होती. त्यामुळे मी आरोपी यांचेकडे सदर कायदेशीर रक्कमेच्या मागणीचा तगादा आरोपी यांचेकडे लावलेमुळे आरोपी यांनी मला रक्कम रू. १,२५,०००/— इतक्या रक्कमेचा कर्णाटक बॅक लि., शाखा : निप्पाणी चा सही केलेला दि. १४/११/२०२५ इ. रोजीचा धनादेश नं. ०३०२९८ हा मला दिला. सदर धनादेश देतेवळी आरोपी यांनी मला आरोपी यांचे खातेवर चेक वटणेइतकी रक्कम ठेवलेची हमी व खात्री देवून सदर धनादेश वटणावळीस दिलेस सदर धनादेश वटणेची हमी व खात्री मला दिली होती.

३) सदरचा धनादेश देतेवेळी आरोपी यांस माहिती आणि ज्ञान होते की, सदरचा धनादेश तारखेस सदर खातेवर कोणतीही रक्कम असणार नाही आणि सदरचा धनादेश वटणार नाही. तथापि, सदरचे कायदेशीर देणेपोटी न वटणारा धनादेश देवून त्याद्वारे माझा गैरवाजवी तोटा करून स्वत:चा गैरवाजवी फायदा करून घेणेचा आरोपी यांचा उद्देश असलेमुळे आरोपी यांचे खातेवर पुरेशी रक्कम असेल असा खोटा आभास आरोपी यांनी माझेसमोर निर्माण केला आणि सदर कायदेशीर देणेपोटी सदरचा धनादेश घेणेस उद्युक्त केले. तथापि, सदरचा धनादेश वटविणेचा कोणताही हेतू आरोपी यांचे मनामध्ये सदरचा धनादेश देतेवेळेस नव्हता. आरोपी यांनी माझेसमोर सदरचा धनादेश वटणेइतकी रक्कम आरोपी यांचे खातेवर असेल असा आभास निर्माण केलेमुळे आणि तो आभास खरा आहे असे मला वाटलेमुळे सदरचा धनादेश मी आरोपी यांचेकडून स्विकारला.

30/03/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

४) मी आरोपी यांचेवर विश्वास ठेवून सदरचा धनादेश वटणेसाठी माझे खाते असलेल्या बॅक ऑफ महाराष्ट्र, शाखा : खडकेवाडा, ता. कागल, जि. कोल्हापूर येथे भरला असता, सदरचा धनादेश 'Funds Insufficient' या शे–यानिशी दि. ०२/०२/२०२६ इ. रोजी न वटता दि. ०३/०२/२०२६ इ. रोजी प्रिंट होवून रिटर्न मेमोसह परत आलेला आहे. आरोपी यांनी मला सदरचा धनादेश वटेल अशी खात्री व हमी दिलेली होती. तथापि, आरोपी यांनी त्यांचे खातेवर पुरेशी रक्कम न ठेवता माझी घोर फसवणूक केलेली आहे.

५) तद्नंतर, मी माझे वकील ॲड. व्ही. एम. हंचनाळे यांचेमार्फत आरोपी यांना दि. १६/०२/२०२६ इ. रोजी रजि. पोस्टाने नोटीस पाठवून मी आरोपी यांना दिलेला धनादेश न वटलेबाबत कळविले होते. सदरची नोटीस ही आरोपी यांना दि. १७/०२/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. मात्र सदर कायदेशीर देय लागत असलेली वर नमूद धनादेशातील रक्कम आजतागायत मला दिलेली नाही. त्यामुळे मला प्रस्तूतची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

६) यातील आरोपी यांनी माझी कायदेशीर देय असलेल्या रक्कमेपोटी रू. १,२५,०००/– (एक लाख पंचवीस हजार फक्त) चा न वटणारा धनादेश देवून माझी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ व बी.एन.एस. कलम ३१८(४) प्रमाणे घोर फसवणूक केलेली आहे. आरोपीने जाणूनबुजून माझी रक्कम बुडविण्याच्या हेतूने व त्यांची फसवणूक करणेच्या दृष्टीने वरील धनादेश दिलेला आहे. अशा प्रकारे आरोपीने माझी आर्थिक फसवणूक केलेली आहे. त्यामुळे सदरची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

७) <u>फिर्यादीस कारण :</u>

यातील आरोपीने माझे कायदेशीर देणे रक्कम रू. १,४५,०००/– (एक लाख पंचेचाळीस हजार फक्त) इतक्या रक्कमेपैकी रक्कम रू.

Umdale 30/3/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

१,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार फक्त) इतक्या रक्कमेचा कर्णाटक बॅक लि., शाखा : निपाणी चा सही केलेला दि. १४/११/२०२५ (चौदा नोव्हेंबर दोन हजार पंचवीस) इ. रोजीचा धनादेश नं. ०३०२९८ हा मला दिला. सदरचा धनादेश मी दि. ०२/०२/२०२६(दोन फेब्रुवारी दोन हजार सव्वीस)इ. रोजी माझे खात्यावर भरला असता सदरचा धनादेश **'फंड्स इनसफिशिएंट'** या शे-यानिशी न वटता दि. ०३/०२/२०२६ (तीन फेब्रुवारी दोन हजार सव्वीस) इ. रोजी अनादर होवून परत आला. त्यानंतर मी माझे वकीलांमार्फत दि. १६/०२/२०२६ (सोळा फेब्रुवारी दोन हजार सव्वीस) इ.रोजी धनादेश अनादर झालेबाबतची व धनादेशामधील रक्कमेची मागणी करणारी नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीस दि. १७/०२/२०२६ इ. रोजी लागू झालेली आहे. तथापि, आरोपीने माझी कायदेशीर देय रक्कम आजतागायत दिलेली नाही. त्यामुळे दि. ०५/०३/२०२६ इ. रोजी फिर्यादीस कारण घडलेले आहे व घडत आहे.

८) **सबब माझी विनंती की,**

अ. आरोपी याने केलेल्या अपराधाची चौकशी व्हावी आणि कायद्यातील तरतुदीनुसार आरोपीस कडक शासन व्हावे.

ब. मला आरोपीकडून धनादेशाच्या दुप्पट रक्कम नुकसान भरपाई मिळावी.

क. न्यायाचे अन्य हुकूम माझे बाजूने व्हावेत.

म्हणून केले व्हेरिफिकेशन.

कागल
दि.३०/०३/२०२६
मी व्हेरिफिकेशन करणार यांना ओळखतो.

अ‍ॅड. व्हि. एम. हंचनाळे

30/03/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

## प्रतिज्ञा

मी यातील फिर्यादी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील व्हेरिफिकेशनमधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल दि. ३०/०३/२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri [illegible]
who is
identified by Shri [illegible]
whom I know personally
Dated 30/3/2026

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.08 15:50:23 +0900